# <u>२४ जून, २०१९ च्या सद्‌गुणावर भाष्य</u>

## सदाशयता

*गरिमा बोरवणकर यांच्याद्वारे लिखित*

*श्रीगुरुमाईंनी २४ जून, २०१९साठी जो सद्‌गुण प्रदान केला आहे, तो आहे ‘सदाशयता’. जिभेवर येताक्षणीच गोडवा पसरवणाऱ्या, हिंदी भाषेतील या सुंदर शब्दात अनेक सूक्ष्म तसेच कधीकधी गूढ भासणारे अर्थ निहित आहेत. हे आवश्यक आहे की, आपण या सगळ्या अर्थांच्या प्रत्येक स्तरावर चिंतनमनन करावे.*

*गुरुमाईंनी जेव्हा पहिल्यांदाच मला सांगितले की, २४ जूनला त्यांच्या जन्मदिवसाप्रीत्यर्थ सर्वांना त्या जो सद्‌गुण देणार आहेत, तो ‘सदाशयता’ आहे, तेव्हा त्यांनी मला विचारले, “‘सदाशयता’ हा शब्द ऐकताच या शब्दाचे किती अर्थ लगेचच तुझ्या मनात येतात?” मी हा शब्द पहिल्यांदा ऐकला, तेव्हा माझे हृदय हेलावले. मी या शब्दाचे विभिन्न अर्थ सांगण्याआधीच मला अंतरात या शब्दाची अनुभूती झाली. त्यानंतर मी गुरुमाईंना ‘सदाशयता’ या शब्दात निहित असलेले काही गुण सांगितले जे त्या वेळी मला सुचले.*

*गुरुमाई म्हणाल्या, “खूप छान. तू सदाशयतेवर भाष्य लिहिणार आहेस, जेणेकरून लोक या सद्‌गुणाचे अन्वेषण व अभ्यास करायला सुरूवात करू शकतील आणि त्यांना जी समज मिळेल, त्यापासून त्यांना लाभ होऊ लागेल.”*

आपल्या अन्वेषणाचे पहिले पाऊल असेल, सदाशयता या शब्दाच्या व्युत्पत्तीवर नजर टाकणे. हिंदीमध्ये याचा धातू शब्द आहे ‘सदाशय’, जो दोन शब्दांनी बनला आहे : ‘सत्’ आणि ‘आशय’. ‘सत्’चा अर्थ आहे, सत्य आणि ‘आशय’चा अर्थ आहे, प्रयोजन किंवा उद्देश. तेव्हा, सदाशय हा शब्द एक असा उद्देश प्रकट करतो जो सत्य आहे आणि हितकारक आहे.

‘सदाशयता’मध्ये निहित असलेले बारकावे त्याच्या अर्थाला अशी सखोलता देतात की, खरोखरच याचे भाषांतर केले जाऊ शकत नाही. इंग्रजी भाषेतील किंवा इतर कोणत्याही भाषेतील कुठलाही एक शब्द या सद्‌गुणाचा संपूर्ण अर्थ सांगण्यासाठी पुरेसा ठरणार नाही. सदाशयता ही सज्जनतेचे किंवा साधूशीलतेचे आवाहन करते. ती उदारता, दिलदारपणा आणि निःस्वार्थता या गुणांनी ओतप्रोत आहे.

तिच्यामध्ये सद्भावना, मृदुलता आणि दयाळूपणा यांचा दरवळ असतो. ती प्रेमाने आणि करुणेने आर्द्र असते. सदाशयता त्या विचारांमध्ये व कर्मांमध्ये झळकते, जे सर्वांच्या कल्याणासाठी असतात.

सदाशयतेमध्ये जे गुण विद्यमान आहेत, त्यांतील काही गुण आपण बारकाईने पाहणार आहोत.

उदाहरणार्थ, एक सन्माननीय आणि परिशुद्ध मनाचे वैशिष्ट्य असणे, ही सज्जनतेची किंवा साधूशीलतेची परिभाषा होय. सज्जन किंवा साधुस्वभाव असलेल्या व्यक्ती उच्च आदर्शांच्या अनुरूप आचरण करतात. त्या व्यक्ती अशी कर्मे करतात, जी इतरांसाठी कल्याणकारक असतात.

औदार्य तो गुण आहे, जो सहसा मनमोकळेपणा किंवा निष्कपटता आणि दयाळूपणा यांच्याशी निगडित असलेला मानला जातो. औदार्यामुळेच एखादी व्यक्ति, कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा केल्याविना, देण्यासाठी प्रेरित होते. औदार्य व्यक्त करण्याच्या अनेक पद्धती आहेत — उदाहरणार्थ एखाद्या व्यक्तीला, एखाद्या संस्थेला इत्यादिंना भौतिक वस्तू देणे, स्वतःचा वेळ देणे, स्वतःची कौशल्ये देणे. तथापि, अशा प्रकारच्या देण्याला ‘औदार्य’ म्हणून एक विशिष्ट ओळख तेव्हाच प्राप्त होते, जेव्हा ही कर्मे व्यक्तिगत प्राप्तीच्या हेतूने नव्हे तर, केवळ भले करण्याच्या उद्देशाने केली जातात.

एक अन्य गुण जो सदाशयतेच्या अर्थामध्ये अधिक भर घालतो, तो आहे दिलदारपणा. दिलदारपणासाठी इंग्रजी शब्द आहे ‘मॅग्नॅनिमिटी’ आणि हा लॅटिन शब्द ‘मॅग्नस’पासून आला आहे, ज्याचा अर्थ आहे ‘महान’. म्हणूनच ‘मॅग्नॅनिमिटी’ म्हणजेच दिलदारपणा हा विशाल-हृदयता, मृदुलता आणि करुणा यांचा द्योतक आहे. दिलदार असण्याचा अर्थ आहे, परिस्थिती कशाही असोत, तरीदेखील प्रत्येक व्यक्तीप्रति विनीत आणि दयाळू असणे, मग वादविवाद असोत किंवा सुसंवाद, विजय असो किंवा पराजय.

कदाचित, आपण अधिकांशतः असा विचार करत असू की, निःस्वार्थता म्हणजे स्वार्थ नसणे होय; कदाचित आपले असे मत असेल की, निःस्वार्थता म्हणजे केवळ स्वतःचाच विचार न करणे किंवा केवळ स्वतःचीच पर्वा न करणे. पण सदाशयतेमध्ये ज्या निःस्वार्थतेचा संकेत आहे तो या अर्थाच्या परे आहे. स्वतःच्या इच्छांची पूर्ती करण्याची पर्वा करण्यापेक्षाही *अधिक,* इतरांच्या आणि या जगताच्या गरजांची पर्वा करण्याशी याचा संबंध आहे. निःस्वार्थता म्हणजे कोणतेही व्यक्तिगत यश, नाव, पद किंवा धन यांची लालसा न बाळगता कार्य करणे. तुम्ही जेव्हा या अर्थाने निःस्वार्थ असता, तेव्हा तुम्ही केवळ इतरांना सुखद व सहज करण्याच्या आणि इतर लोक क्षेमकुशल असावेत या इच्छेने प्रेरित असता.

निसर्गाने सदाशयतेचे वस्त्र परिधान केले आहे — वाहणाऱ्या नद्या पाणी प्रदान करतात, ते पाणी जे जीवनासाठी अपरिहार्य आहे; विपुलतेने बहरलेले वृक्ष जे सूर्याच्या उष्णतेपासून संरक्षणासाठी शीतल

छाया प्रदान करतात आणि मुक्तपणे आपली फळे व फूले सर्वांना देतात; हवा जी सर्व प्राणीमात्रांना श्वास घेण्यास सक्षम बनवते. निसर्गाच्या सदाशयतेमुळेच या वैभवशाली आणि बहुमूल्य पृथ्वी ग्रहावर जीवन टिकून आहे. निसर्ग हा भगवंताच्या सदाशयतेचे प्रतिबिंब आहे.

कश्मीरमधील, चौदाव्या शतकामध्ये होऊन गेलेल्या संतकवयित्री लल्लेश्वरी, भगवान शिवाच्या महान भक्त होत्या. आपल्या गूढ काव्यात त्यांनी अशा सुंदर प्रतिमा प्रस्तुत केल्या आहेत की, त्या प्रतिमा आपल्याला याचे स्मरण करवून देतात की, भगवान शिव प्रत्येक प्रत्येक गोष्टीत, सर्वत्र विद्यमान आहेत. संत लल्लेश्वरींची दोन पदे मला अतिशय प्रिय आहेत :

*'ॐ नमः शिवाय'ने स्पंदित होत,*

*रोपे मातीतून उगवतात.*

*'ॐ नमः शिवाय' पुटपुटत,*

*साधुजन पावन नद्यांमध्ये स्नान करतात.*

*'ॐ नमः शिवाय' गुणगुणत,*

*माता शिशूंना स्तनपान करतात*

*सर्वकाही शिवाचे नाम*

*गात आहे . . .*

* * *

*सूर्याची किरणे*

*कोणताही भेदभाव करत नाहीत.*

*ती सर्व घरांमध्ये समान रूपाने प्रवेश करतात.*

*मेघ कोणताही पक्षपात न करता*

*सर्वांवर पावसाचा वर्षाव करतात.*

*ते परम तत्त्व*

*निष्पक्ष होऊन*
*प्रत्येक स्थानी स्वतःच्या पूर्णतेत विद्यमान आहे.[1]*

भगवंताचा प्रकाश जेव्हा तुमच्या हृदयात चमचमत असतो, तेव्हा तुम्ही आपल्या आजुबाजूला असलेल्या प्रत्येक वस्तूत त्याची उपस्थिती पाहता. तुम्ही संपूर्ण जगताला भगवंताच्या सृष्टीच्या रूपात पाहता. आणि जेव्हा तुम्ही या बोधासह जगता, तेव्हा तुमचे प्रेम अत्यंत स्वाभाविकपणे समस्त सृष्टीला स्वतःमध्ये सामावून घेण्यासाठी मुक्तपणे प्रवाहित होते. तुम्हाला असे वाटते की, या जगतातील प्रत्येक गोष्ट वृद्धिंगत व्हावी, तिची भरभराट व्हावी. आणि मग तुमचे मन एका उच्चतम उद्देशाशी जोडले जाते. तीच आहे ‘सदाशयता’.

हे समजून घ्या की, या सद्‌गुणाच्या अभ्यासात सहजता आहे. सदाशयतेचा सद्‌गुण प्रकट करण्यासाठी तुम्हाला कोणत्याही प्रकारचा जोर लावण्याची गरज नाही. त्याऐवजी, तुम्ही स्वतःचा बोध शुद्ध करता आणि तो या ज्ञानाशी एकलय करता की, फक्त तुम्हीच नव्हे, तर या जगतात असलेली प्रत्येक गोष्ट ही भगवंताच्या प्रेमाने, भगवंताच्या दर्शनाने परिपूर्ण आहे. या बोधाच्या सहाय्याने तुम्ही स्वतःमधून बाहेर पडून, या ब्रह्मांडाशी स्वतःला जोडण्यास समर्थ होता. सदाशयता ही आचरणात आणण्याची एक पद्धत आहे : स्वतःसोबत, इतरांसोबत आणि जगतासोबत.

**अभिकथन**

मी सदाशयतेसह पुढे जातो.

*[अभिकथन— ती कथने ज्यांचे जागरूकतेने पुन्हापुन्हा उच्चारण केले जाते, जेणेकरून ती आपल्या चेतनेत खोलवर रुजतील.]*

---

[1] *Lalleshwari,* हिंदी भावार्थ, स्वामी मुक्तानंद यांच्याद्वारे, तथा इंग्रजी भाषांतर, स्वामी कृपानंद यांच्यासह गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे [साउथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क : एस. वाय. डी. ए. फाउंडेशन, १९८१, © गुरुदेव सिद्धपीठ, गणेशपुरी, भारत] पद २०, पृष्ठ १०; आणि पद ४३, पृष्ठ २२.

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.